सकाळ



**इंडिया हाउस आर्ट गॅलरी, बालेवाडी :** 'लेट अ थाउजंड फ्लॉवर्स ब्लूम' कला प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित विविध क्षेत्रांतील मान्यवर.

# ओडिसी नृत्याविष्काराचा कलासंगम

## बालेवाडीत 'लेट अ थाउजंड फ्लॉवर्स ब्लूम' प्रदर्शन सुरू

**औंध, ता. २१ :** ओडिसी नृत्याच्या मोहकतेने प्रेरित रेखाचित्र, चित्रकला आणि छायाचित्रांचा संगम असलेले 'लेट अ थाउजंड फ्लॉवर्स ब्लूम' या कला प्रदर्शनाचे बालेवाडीतील सोपानबाग रस्त्यावरील इंडिया हाउस आर्ट गॅलरीत नुकतेच उद्‌घाटन झाले. हे प्रदर्शन बुधवारपर्यंत (ता. २५) सकाळी १० ते रात्री १० पर्यंत सर्वांसाठी खुले आहे.

ओडिसी नृत्याचे सौंदर्य, लय आणि भावपूर्ण हालचालींना साकारणाऱ्या प्रदर्शनात भारत आणि मलेशियामधील २१ कलाकारांचा सहभाग आहे. भुवनेश्वर, चेन्नई आणि मलेशिया येथील कलाकार एकत्र येऊन सांस्कृतिक संवाद साधणार आहेत.

यावेळी 'सकाळ माध्यम समूहा'च्या संचालिका मृणाल पवार प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रदर्शनाचे क्युरेटर पद्मश्री दातुक रामली इब्राहिम, 'बीव्हीजी'चे संस्थापक-अध्यक्ष हनुमंतराव गायकवाड, वास्तुविशारद विकास आचलकर, प्रदर्शनाचे आयोजक रामप्रसाद अक्कीशेट्टी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

चेन्नई आणि भुवनेश्वरमध्ये यशस्वीरीत्या झालेल्या प्रदर्शनानंतर आता पुणेकरांना कलानुभव घेण्याची संधी मिळणार आहे. पाच वर्षांनंतर नूतनीकरण केलेल्या गॅलरीचेही या वेळी उद्‌घाटन झाले. या प्रदर्शनात दातुक रामली इब्राहिम यांचा माहितीपट व व्याख्यान ऐकण्याची, तसेच पुणेरी स्ट्रीट फूडचा आस्वाद घेण्याची संधी आहे.

> प्रदर्शनात सहभागी झालेले सर्व २१ कलाकार विविध प्रकारे ओडिसी नृत्याने प्रेरित झालेले असून, काहींनी प्रत्यक्ष सादरीकरणांचा अनुभव घेतलेला आहे. काहींनी नर्तकांचे छायाचित्रण केले आहे, तर अनेकांनी रंग आणि रेषांच्या माध्यमातून तिच्या लयबद्ध भूमितीचे सूक्ष्म अर्थ उलगडले आहेत. या कलाकृती केवळ दस्तऐवजीकरण नसून त्या सर्जनशील प्रतिक्रिया आहेत. हालचाल, पौराणिक कथा आणि मानवी आकृतीच्या काव्यात्मकतेवर आधारित वैयक्तिक चिंतन करणारे आहे.
>
> **- दातुक रामली इब्राहिम**